आकाशवाणी मुंबई
प्रादेशिक बातमीपत्र - दुपारी ३.०० वाजता
४ सप्टेंबर २०२६ - शुक्रवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- इस्त्रोच्या EOS-05 या भूनिरीक्षण उपग्रहाचं आज पहाटे यशस्वी प्रक्षेपण

- येत्या १० वर्षांत मुंबई झोपडपट्टी मुक्त करण्याचं राज्य सरकारचं उद्दिष्ट

- कृष्णजन्मोत्सवाचा सर्वत्र उत्साह

- नेपाळमध्ये पूरबळींची संख्या १ हजार २८२वर, ५ हजारापेक्षा जास्त अद्याप बेपत्ता

**आणि**

- चायना मास्टर्स बॅडमिंटन स्पर्धेत पुरुष दुहेरीच्या उपान्त्यपूर्व फेरीत सात्विक साईराज रांकीरेड्डी आणि चिराग शेट्टी यांचा डेन्मार्कच्या जोडीशी सामना

**<><><><><>**

इस्त्रो अर्थात भारतीय अंतराळ संशोधन संस्थेने EOS-05 या भूनिरीक्षण उपग्रहाचं आज पहाटे आंध्र प्रदेशात श्रीहरिकोटा इथल्या सतीश धवन अंतराळ केंद्रावरून यशस्वी प्रक्षेपण केलं. हे प्रक्षेपण आज पहाटे २ वाजून ५५ मिनिटांनी GSLV-F17 रॉकेटच्या माध्यमातून करण्यात आलं. रॉकेटच्या उड्डाणानंतर १८ मिनिटांनी २ हजार ३६७ किलो वजनाचा हा उपग्रह त्याच्या नियोजित कक्षेत स्थापित करण्यात आला. पृथ्वीला स्वतःभोवती एक प्रदक्षिणा पूर्ण करायला जितका वेळ लागतो, तेवढ्याच वेळात हा उपग्रह पृथ्वीभोवती एक प्रदक्षिणा पूर्ण करेल, अशा कक्षेत त्याची स्थापना केली आहे. या उपग्रहामुळे भूनिरीक्षणाची भारताची क्षमता अधिक बळकट होणार आहे. या उपग्रहामुळे मिळणारी माहिती कृषी, नैसर्गिक संसाधनांचं निरीक्षण आणि आपत्ती व्यवस्थापन या क्षेत्रामध्ये उपयुक्त ठरणार आहे, असं इस्त्रोचे अध्यक्ष व्ही. नारायणन यांनी सांगितलं आहे.

या यशस्वी प्रक्षेपणाबद्दल प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी कौतुक केलं आहे. इस्त्रो आणि भारतीय उद्योगक्षेत्र यांच्यातल्या वाढत्या भागीदारीमुळे देशाच्या अंतराळ कार्यक्रमाचा विस्तार होत असून, संपूर्ण अंतराळ परिसंस्थेमध्ये भारताची क्षमता वाढत असल्याचं त्यांनी समाज माध्यमावरच्या संदेशात म्हटलं आहे. संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनीही उपग्रह प्रक्षेपणाच्या यशाचं कौतुक केलं आहे.

<><><><><>

येत्या दहा वर्षांत मुंबई झोपडपट्टीमुक्त करण्याचं सरकारचं उद्दिष्ट आहे. धारावी पुनर्विकास, म्हाडा वसाहतींचा पुनर्विकास तसेच बेस्टच्या आगारांचा आधुनिक पद्धतीने विकास यामुळे मुंबईचा चेहरामोहरा बदलणार आहे, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी व्यक्त केला. काल मुंबईत बांधकाम व्यावसायिकांच्या एका कार्यक्रमात ते बोलत होते.

जानेवारी २०२९ पर्यंत धारावीतल्या १० हजार पुनर्वसन सदनिका तयार करण्याचे उद्दिष्ट आहे. त्याचबरोबर, म्हाडाच्या ५० वर्षांपूर्वी विकसित झालेल्या वसाहतींच्या पुनर्विकासाचीही मोठी गरज आहे. उपलब्ध भू-संपत्तीचा योग्य आणि अधिक कार्यक्षम वापर करून मुंबईचा नियोजित विकास करण्यात येत असल्याची माहिती त्यांनी दिली.

मुंबई महानगर प्रदेशाचा विकास आराखडा २०४७ पर्यंत एमएमआरची अर्थव्यवस्था १.५ ट्रिलियन डॉलरपर्यंत नेण्याच्या उद्देशाने तयार करण्यात आला आहे. एमएमआर, पुणे महानगर प्रदेश आणि नागपूर महानगर प्रदेशात पुढील पिढीचे शहरीकरण वेगाने होणार आहे, असं ते म्हणाले.

नागपूरमध्ये ‘न्यू नागपूर’ विकसित होत असून, उद्योगांसाठी प्लग-अँड-प्ले सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. रिअल इस्टेट क्षेत्रातील उद्योजकांनी या संधींचा लाभ घ्यावा, असे आवाहन मुख्यमंत्र्यांनी केले.

<><><><><>

श्रावण वद्य अष्टमी, 'जन्माष्टमी'च्या सणाचा उत्साह  आज सर्वत्र दिसून येत आहे. राजधानी मुंबईत विविध कृष्णमंदिरांमधे तसंच सामाजिक आणि धार्मिक संस्थांमधे कृष्णजन्मोत्सवानिमित्त विशेष पूजा अर्चना तसंच प्रवचन, कीर्तन भजन, आरती अशा कार्यक्रमांचं आयोजन करण्यात आलं आहे. मध्यरात्री श्रीकृष्ण जयंतीचा उत्सव झाल्यानंतर उद्या दहीहंडी फोडून गोपाळकाला साजरा केला जाईल. मुंबई आणि कोकणात या खेळाचं मोठ्याप्रमाणावर आयोजन केलं जातं. मुंबईत विविध राजकीय पक्ष, संघटना आणि प्रबावशाली व्यक्तींच्या दहीहंडी पथकांचा गेले अनेक दिवस सराव सुरु आहे. विविध मंडळांच्या हंड्या फोडण्यासाठी मोठमोठ्या रकमांची बक्षिसं लावली आहेत.

उत्तर प्रदेशात मथुरा आणि वृंदावनमध्ये आज रात्री १२ वाजता  कृष्णजन्मोत्सव आयोजित करण्यात आला आहे.

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी देशवासियांना जन्माष्टमीनिमित्त शुभेच्छा दिल्या आहेत. भगवान श्रीकृष्णांचं  चरित्र भारतीय संस्कृतीच्या अजरामर मूल्यांचं प्रतीक असल्याचं त्यांनी म्हटलं आहे.  भगवान श्रीकृष्णांनी सांगितलेल्या उपदेशानुसार प्रत्येकाने एकता, शांती आणि सलोखा या तत्वांचं पालन करावं, असं आवाहनउपराष्ट्रपती सी पी राधाकृष्णन यांनी केलं आहे.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी म्हटलंय की कृष्णचरित्राचं स्मरण प्रत्येकाच्या जीवनात आनंद आणि ऊर्जा निर्माण करतं.

केंद्रीय गृहमंत्री अमित शहा आणि संरक्षण मंत्री राजनाथ सिंग यांनीही जन्माष्टमीनिमित्त देशवासियांना शुभेच्छा दिल्या आहेत.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही राज्यातल्या जनतेला कृष्णाष्टमीनिमित्त शुभेच्छा दिल्या आहेत.

<><><><><>

नेपाळमध्ये आलेल्या महापुरातल्या मृतांची संख्या १ हजार २८२वर पोहोचली आहे तर ५ हजारापेक्षा जास्त जण अद्याप बेपत्ता आहेत. या दुर्घटनेतल्या मृतांची ओळख पटवण्यासाठी नेपाळनं डीएनए चाचण्या करायला सुरुवात केली आहे. दरम्यान, नेपाळच्या त्रिशुली इथल्या जलविद्युत प्रकल्पाच्या बोगद्यात गेले १० दिवस अडकेल्या दोघांची आज सुटका करण्यात आली. आत्तापर्यंत १२ हजारापेक्षा जास्त जणांना वाचवण्यात आपत्कालीन पथकांना यश आलं आहे. नेपाळ-तिबेट सीमेवर २६ ऑगस्ट रोजी अचानक आलेल्या या महापुरामुळे उत्तर आणि मध्य नेपाळमधली अनेक गावं, खेडी उद्ध्वस्त झाली आहेत.

<><><><><>

शेन्झेन इथं सुरू असलेल्या 'चायना मास्टर्स सुपर 750' बॅडमिंटन स्पर्धेतल्या पुरुष एकेरीच्या उपांत्यपूर्व फेरीत भारताच्या  किदाम्बी श्रीकांतचं आव्हान आज संपुष्टात आलं. हाँगकाँगच्या ली चेऊक यिऊबरोबर झालेल्या सामन्यात त्याला १६-२१, १६-२१ असा पराभव पत्करावा लागला. पुरुष दुहेरीत सात्विक साईराज रांकीरेड्डी आणि चिराग शेट्टी या जोडीचा सामना  उपांत्यपूर्व फेरीत डेन्मार्कच्या किम ॲस्ट्रिप आणि अँडर्स स्कारूप रासमुसेन या जोडीबरोबर संध्याकाळी ४ वाजता आहे.

<><><><><>

अमेरिकन खुल्या टेनिस स्पर्धेत पुरुष एकेरीत कॅरेन खचानोव्ह यानं जागतिक क्रमवारीत चौथ्या स्थानावर असलेल्या फीलिक्स ऑजर अलियासीम याला पराभवाचा धक्का दिला. ३ तास चाललेला हा सामना त्यानं ६-७, ६-३, ६-२, ६-२ असा जिंकला आणि तिसऱ्या फेरीतलं स्थान निश्चित केलं. दुसऱ्या सामन्यात डेन स्वीनी यानं १३व्या क्रमांकावर असलेला लॉरेंझो मुसेटी याच्यावर ६-३, ६-१, ६-२, ६-२ अशी मात केली. दरम्यान, कार्लोस अल्काराज, टेलर फ्रिट्झ, अलेक्झांडर बुबलिक, फ्रान्सिस टिआफो, अलेक्झांडर झ्वेरेव्ह, लर्नर टिएन यांनी आपापल्या प्रतिस्पर्ध्यांवर मात करून तिसऱ्या फेरीत प्रवेश केला. महिला एकेरीत अमांडा अनिसिमोव्हा, नाओमी ओसाका, इगा श्वियांतेक, लिंडा नोस्कोव्हा, एलिना स्वितोलीना, एकातेरीना अलेक्झांड्रोव्हा, कॅरोलीना मुकोव्हा, एलेना रिबाकीना, कोको गॉफ, मिरा अँड्रीव्हा यांनी आपापले सामने जिंकून तिसरी फेरी गाठली.

<><><><>

बेल्जियमचे प्रधानमंत्री बार्ट दे वीव्हर यांचं आज मुंबईत आगमन झालं. छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळावर राज्याचे राजशिष्टाचार मंत्री जयकुमार रावल यांनी त्यांचं स्वागत केलं. प्रधानमंत्री वीव्हर आज भारत-युरोपीय संघ मुक्त व्यापार कराराबाबत भारत-बेल्जियम उच्चस्तरीय संवादात सहभागी होणार आहेत. केंद्रीय वाणिज्य आणि उद्योगमंत्री पियूष गोयल आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हेदेखील या कार्यक्रमात भाग घेतील. मुंबईच्या वांद्रे-कुर्ला संकुलात आज दुपारी हा कार्यक्रम होणार आहे.

<><><><>

दिव्यांग रुग्णांना शासकीय, आणि निमशासकीय रुग्णालयांमधे निःशुल्क वैद्यकीय उपचार मिळावे अशी मागणी महाराष्ट्र राज्य राजपत्रित महासंघाने केली आहे. २००१ पर्यंत दिव्यांग रुग्णांना शासकीय रुग्णालयात केसपेपर शुल्क वगळता इतर उपचार निःशुल्क मिळत होते. मात्र नंतर शासन निर्णयान्वये ही सुविधा बंद झाली. संवेदनशील दृष्टिकोनातून या निर्णयात सुधारणा करुन दिव्यांग रुग्णांना मोफत औषधोपचार उपलब्ध करुन द्यावे, असं संघटनेनं प्रसिद्ध केलेल्या पत्रकात म्हटलं आहे.

<><><><>

मुंबईत जिल्हा कौशल्य विकास, रोजगार आणि उद्योजकता मार्गदर्शन केंद्रांने 'पंडित दीनदयाळ उपाध्याय विश्वविक्रमी रोजगार महाकुंभाचं आयोजन केलं आहे. मुंबईत २९

सप्टेंबरला १० ठिकाणी हे रोजगार मेळावे होणार असून यासाठी मोठ्या संख्येने नोंदणी करण्याचं आवाहन मुंबई जिल्हा कौशल्य विकास, रोजगार आणि उद्योजकता विभागाच्या सहाय्यक आयुक्तांनी केलं आहे. कार्यशाळेमध्ये उमेदवारांना मुलाखतीची तयारी, संवाद कौशल्य, व्यक्तिमत्त्व विकास आणि इतर कौशल्यांचं नोकरीपूर्व प्रशिक्षण मिळेल आणि प्रशिक्षणासाठी शुल्क आकारलं जाणार नाही. अशी माहिती त्यांनी दिली.

<><><><><>

गडचिरोली जिल्ह्यातल्या सगळ्या अंगणवाड्यांमध्ये सप्टेंबरमध्ये पोषण माह साजरा करण्यात येत आहे. ग्रामीण तसंच शहरी भागातल्या एकूण २४०२ अंगणवाड्यांमध्ये हे अभियान राबवलं जाणार आहे.

<><><><><>

अकोला शहरात चार केंद्रांवर पर्यावरणपूरक गणपती तयार करण्यासाठी कार्यशाळेचं आयोजन करण्यात आलं आहे. या कार्यशाळेत २० हजार विद्यार्थी भाग घेतील.

// <><><><><>//